E-9670423



ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिक्षा अंतिम करणे बाबत.( श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-वडारवाडी, ता.अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/332/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ:-१.या कार्यालयाकडील दोषारोप पत्र क्र.ग्रापं-३/१६६६३७६/२०२५, दिनांक १६/०९/२०२५.
२. श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वडारवाडी, तालुका अहिल्यानगर यांचा खुलासा दिनांक २४/१०/२०२५.
३.या कार्यालयाकडील पत्र क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३२२/२०२५,दिनांक २५/१२/२०२५.
४.गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१२३/२०२६, दिनांक २९/०१/२०२६.
५.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२१५५६५/२०२६, दि.०८/०३/२०२६
६.गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/३४६/२०२६, दि.३०/०३/२०२६ नुसार श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी यांचा खुलासा दिनांक २०/०३/२०२६
७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२)

संदर्भ क्र.१ नुसार श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत- वडारवाडी,ता. अहिल्यानगर यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने ज्ञापन बजावण्यात आले होते. संदर्भ क्र.२ च्या खुलाशाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी श्री सोनवणे यांनी निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता केल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालयात निविदा प्रक्रियेमध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७, दि.१९ ऑक्टोंबर, २०११ नुसार दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आलेला नाही.

सबब, श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत- वडारवाडी,ता.अहिल्यानगर यांना संदर्भ क्र.५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील एक वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होणार नाही, अशी दोन वर्ष थोपविणे बाबतची नोटीस देण्यात आलेली होती. संदर्भ क्र.६ नुसार खुलासा सादर करण्यात आलेला आहे. सदर खुलाश्यानुसार शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७, दि.१९ ऑक्टोंबर, २०११ नुसार कार्यपध्दतीचा अवलंब केला असुन नजरचुकीने काही त्रुटी राहुन गेल्या आहेत. यापुढे अशी चुक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. तरी

Scanned with OKEN Scanner

खुलासा मान्य करुन कमीत कमी शिक्षा देण्यात यावी, असे खुलाश्यात श्री सोनवणे यांनी नमुद केले आहे. यावरुन श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या खुलाश्याचे अवलोकन करुन त्यांना या आदेशान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने १ वर्ष रोखणे ---------- ही शिक्षा अंतिम करण्यात येत असुन या आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०८२७०६०१२८ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-08-2026 09:22:42
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:-

श्री अभय भाऊराव सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत- वडारवाडी,ता.अहिल्यानगर
व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर.

२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

Scanned with OKEN Scanner